## MAHARASHTRA ACT No. II OF 1984.

## THE MAHARASHTRA DEBT RELIEF (RETROSPECTIVE EXTENSION OF DURATION OF CERTAIN CHAPTERS) ACT, 1983.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक ७ जानेवारी १९८४ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

१९८० चा महाराष्ट्र १६.

डी. एन. चौधरी,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

१९८३ चा महाराष्ट्र अध्यादेश १७.

## MAHARASHTRA ACT No. II OF 1984.

## AN ACT FURTHER TO EXTEND THE DURATION OF CHAPTERS IV AND V OF THE MAHARASHTRA DEBT RELIEF ACT, 1975.

[राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक ७ जानेवारी १९८४ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला]

### सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २.

**महाराष्ट्र ऋणग्रस्ततेपासून मुक्तता अधिनियम, १९७५ याची प्रकरणे चार व पाच यांची मुदत आणखी वाढवण्याकरिता अधिनियम.**

ज्याअर्थी, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९७६ चा महाराष्ट्र ३. १९८३ चा महाराष्ट्र अध्यादेश २०.

आणि ज्याअर्थी, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी महाराष्ट्र ऋणग्रस्ततेपासून मुक्तता अधिनियम, १९७५ याची प्रकरणे चार व पाच यांची मुदत पूर्वलक्षी प्रभावासह आणखी वाढवण्यासाठी त्वरीत कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक झाले अशी परिस्थिती अस्तित्वात होती याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री झाली होती आणि म्हणून त्यांनी दिनांक १६ नोव्हेंबर १९८३ रोजी महाराष्ट्र ऋणग्रस्ततेपासून मुक्तता (विवक्षित प्रकरणांच्या मुदतीत पूर्वलक्षी प्रभावासह वाढ करणे) अध्यादेश, १९८३ हा प्रख्यापित केला होता ;

आणि ज्याअर्थी, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या चौतिसाव्या वर्षी याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ. १. (१) या अधिनियमास महाराष्ट्र ऋणग्रस्ततेपासून मुक्तता (विवक्षित प्रकरणांच्या मुदतीत पूर्वलक्षी प्रभावासह वाढ करणे) अधिनियम, १९८३ असे म्हणता येईल.

(२) तो, दिनांक २१ ऑगस्ट १९८३ पासून अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३ याच्या कलम १४-अ ची सुधारणा. २. महाराष्ट्र ऋणग्रस्ततेपासून मुक्तता अधिनियम, १९७५ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम १४-अ मध्ये "२१ ऑगस्ट १९८१ हा दिवस धरून त्या दिवशी संपणाऱ्या" या मजकुराऐवजी "२१ ऑगस्ट १९८५ हा दिवस धरून त्या दिवशी संपणाऱ्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९७६ चा महा-राष्ट्र ३.

पूर्वलक्षी प्रभावाचे परिणाम. ३. (१) याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, जी २१ ऑगस्ट १९८३ नंतर समाप्त होणार होती व जी या अधिनियमाद्वारे पूर्वलक्षी प्रभावाने, २१ ऑगस्ट १९८५ हा दिवस धरून त्या दिवसापर्यंत वाढवण्यात आलेली आहे आणि शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे जी दोन वर्षांपेक्षा अधिक नसेल एवढ्या कालावधीकरिता आणखी वाढविण्याचे अधिकार राज्यशासनाकडे घेण्यात आले आहेत, अशी मुख्य अधिनियमाची प्रकरणे चार व पाच यांची मुदत ही कोणत्याही वेळी समाप्त झाल्याचे मानण्यात येणार नाही आणि या अधिनियमाद्वारे सुधारण्यात आलेले त्या प्रकरणांचे सर्व उपबंध विधिग्राह्य, परिणामकारक व अखंडपणे अंमलात असल्याचे मानण्यात येईल.

(२) याद्वारे आणखी असे घोषित करण्यात येत आहे की, २२ ऑगस्ट १९८३ ते हा अधिनियम शासकिय राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या तारखेच्या लगतपूर्वीच्या तारखेपर्यंतच्या (दोन्ही दिवस धरून) कालावधीत कोणत्याही व्यक्तीने, या अधिनियमाद्वारे सुधारण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाची प्रकरणे चार व पाच यांच्या उपबंधाशी विसंगत अशी केलेली कोणतीही कारवाई किंवा वसुली यासह केलेली कोणतीही गोष्ट ही रद्दबातल असल्याचे मानण्यात येईल आणि उक्त कालावधीत उक्त उपबंधाशी सुसंगत अशी केलेली कोणतीही गोष्ट ही, विधिग्राह्य, परिणामकारक व अखंडपणे अंमलात असल्याचे मानण्यात येईल.

सन १९८३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. २० याचे निरसन व व्यावृत्ती. ४. महाराष्ट्र ऋणग्रस्ततेपासून मुक्तता (विवक्षित प्रकरणांच्या मुदतीत भूतलक्षी प्रभावासह वाढ करणे) अध्यादेश, १९८३ हा याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. १९८३ चा महा. अध्या. २०.

१९७६ चा महा-राष्ट्र ३८.

१९७६ चा महा. ३८.

(यथार्थ अनुवाद)

न. ब. पाटील,
भाषा संचालक,
महाराष्ट्र राज्य.